लोकमत

# कामगारांच्या मुलांना स्पर्धा परीक्षेचे धडे

## कल्याण केंद्रात प्रवेश : यूपीएससी, एमपीएससीचे मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्यातील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांच्या केंद्रांत लवकरच कामगारांच्या पाल्यांना स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण घेता येईल. यूपीएससी, एमपीएससी यासह बँकिंग, पोलीस, तलाठी, लिपिक, स्टाफ सिलेक्शन अशा सर्व महत्त्वांच्या सरळसेवा भरती परीक्षांचे धडे कामगारांच्या पाल्यांना देण्यात येणार आहेत. कामगारमंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांनी या योजनेला शुक्रवारी हिरवा कंदील दाखविल्याची माहिती कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांनी दिली.

दाभाडे यांनी सांगितले की, राज्यात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची २२७ केंद्रे आहेत. या केंद्रांमध्ये कामगार कुटुंबीयांसाठी शिवण वर्ग, शिशुमंदिर, वाचनालये, अभ्यासिका, ग्रंथालये असे उपक्रम राबविले जातात. मात्र, मंडळाने कौशल्य विकास प्रशिक्षण आणि रोजगाराभिमुख योजना राबविण्याकडे अधिक लक्ष देण्याचे निर्देश कामगारमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार, कामगार विभागाचे प्रधान सचिव राजेश कुमार यांनी कामगार पाल्यांसाठी स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू करण्याची योजना तयार केली. त्यासाठी राज्यातील नामांकित व अनुभवी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. मंडळाच्या शिफारसीनुसार शासनाने नाशिकच्या एका खासगी संस्थेस पुढील दोन वर्षांसाठी हे काम दिले आहे.

कामगार पाल्यांनी मंडळाच्या नजीकच्या केंद्रात जाऊन सदर वर्गासाठी नोंदणी कराची आहे. नोंदणीनुसार त्या-त्या केंद्रांतून स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू केले जाणार आहेत. केंद्रांचे सविस्तर पत्ते मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

### मुलींसाठी राखीव जागा

परीक्षेच्या अभ्यासक्रमानुसार २ ते ८ महिने कालावधीचे वर्ग असणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याचा स्टडी मटेरियल, टेस्ट सीरिजचा खर्च मंडळ करणार आहे. प्रत्येक बॅचमध्ये ३० ते ५० विद्यार्थी असतील. यातील ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव आहेत.